# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. ०७१२-२५६७०२८
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. १६४/शि.वि./२०१६
दि. २७/०१/२०१६

प्रति,

मुख्याध्यापक/मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ./उच्च प्राथ./माध्यमिक शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :- खालील विविध उपक्रमात शालेय विद्यार्थ्यांना सहभागी करण्याबाबत.**

**संदर्भ :- कार्यालय, शिक्षण उपसंचालक, नागपूर विभाग, नागपूर यांचे दि. ०४.०१.२०१६ चे पत्र.**

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने कळविण्यात येते की, आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना खालील विविध उपक्रम प्रदर्शनीला भेट द्यावयाची असून शाळेत करावयाचे आवश्यक कामे खाली नमूद केले आहे.

१) रमन सायन्स सेंटर, शुक्रवारी तलावाजवळ, नागपूर व सेंटर फॉर रूरल वेलफेअर, नागपूर यांच्या संयुक्त विद्यामाने दि.२० डिसेंबर ते ८ फेब्रूवारी २०१६ पर्यंत जीवनासाठी पाणी या महत्वपूर्ण विषयावर भव्य प्रदर्शनीचे आयोजन रमन सायन्स सेंटर, गांधीसागर, नागपूर येथे आयोजन करण्यात आले आहे.यामध्ये विद्यार्थ्यांमधून जलसंस्कार व भविष्यात जलवायू परीवर्तनामुळे निर्माण होणाऱ्या समस्याबद्दल अभ्यासपूर्ण माहिती तसेच पाण्याच्या विविध पैलूवर चर्चासत्र आणि दि.०३.०२.२०१६ रोजी निबंधस्पर्धा, रांगोळी स्पर्धा व पाण्यावर आधारीत जलचित्राचे सादरीकरण सकाळी ११.०० वाजता करण्यात येणार आहे.

विषय - पाणी आणि पाण्याचा वापर- या उपक्रमात विद्यार्थ्यांना सहभागी करावे.सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र व भरघोस बक्षिसे देण्यात येणार आहे.

२)एम.बी.वाय.एस बास्केट बॉल मैदान, बजाजनगर येथे किल्ले महोत्सव दि.२४.०१.२०१६ते ३०.०१.२०१६ पर्यंत आयोजित करण्यात आले आहे.या प्रदर्शनाला आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना भेट देण्यास सूचना देण्यात याव्या.

३)दि.३०.०१.२०१६ ते ०७.०२.२०१६ दरम्यान नॅशनल बूक फेअर चे आयोजन कस्तुरचंद पार्क, नागपूर येथे आयोजन करण्यात आले आहे.या प्रदर्शनाला आपल्या शाळेतील विद्यार्थ्यांना व शिक्षकांना भेट देण्यास सूचना देण्यात याव्या.

४)ज्या शाळांमध्ये इंग्रजी माध्यम/सेमी इंग्रजी माध्यम अभ्यासक्रम सुरू आहे अशा शाळांनी शालेय बोर्डवर ठळक अक्षरात तसा उल्लेख करावा.जेणे करून सर्वांना याबाबत माहिती प्राप्त होईल.

५)प्रत्येक शाळेने दर्शनी भागात शाळेची वेळ ठळक अक्षरात लिहावी.

६)प्रत्येक शाळेने अग्निशामक यंत्र तपासणी करून अग्निशमन यंत्र अद्यावत करावे.

७)वार्षिक कार्ययोजना व अंदापत्रक २०१६-१७ तयार करण्याची कार्यवाही सुरू झाली असून याकरीता आपल्या शाळेतील सत्र २०१४-१५ मधील संकलित मुल्यमापन १ व २ चा निकालाचा गोषवारा सर्व शिक्षा अभियान व एक प्रत शाळा निरीक्षक यांचेकडे दि. २९.०१.२०१५ पर्यंत सादर करावा.

शिक्षणाधिकारी,
महानगरपालिका, नागपूर

pc;2/reshma /Tembhurne sir/letterT